म.वि.स/ड-१७ ( मराठी भाषा समिती) /२०२३

सादर :

मराठी भाषा विभागाचे शासन परिपत्रक क्रमांक वाप्रेदि-२०२३/प्र.क्र.१००/भाषा-३. दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ कृपया पहावे.

सदरहू शासन परिपत्रकान्वये, माजी राष्ट्रपती स्व.डॉ.ए.पी. जे. अब्दुल कलाम यांच्या स्मृती जतन करण्याच्या उद्देशाने दिनांक १५ ऑक्टोबर हा त्यांचा जन्मदिवस "वाचन प्रेरणा दिन" म्हणून साजरा करण्यात येतो. वाचन प्रेरणा दिनानिमित्त वाचन संस्कृती वृध्दींगत होण्यासाठी विविध प्रकारचे संदेश, व्याख्याने, चर्चासत्रे, अभिवाचन, सामूहिक वाचन, ग्रंथ प्रदर्शन इत्यादी कार्यक्रमासाठी मराठी भाषा विभाग व अधिनस्त कार्यालय यांना कार्यक्रमाचे आयोजन करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच मंत्रालयीन विभाग व त्यांच्या अधिपत्याखालील सर्व शासकीय/निमशासकीय कार्यालये, शासकीय संस्था/मंडळ, सार्वजनिक उपक्रम, इ. कार्यालयांनी वाचन प्रेरणा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन करावयाचे आहे.

"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" (दि.१४ ते २८ जानेवारी), "मराठी भाषा गौरव दिन" (दिनांक २७ फेब्रुवारी) "मराठी राजभाषा दिन" (१ मे) "वाचन प्रेरणा दिन" (१५ ऑक्टोबर) या दिनविशेषाच्या निमित्ताने मराठी भाषेसंदर्भात शासकीय/निमशासकीय कार्यालये,विविध संस्था, महाविद्यालये, शाळा इत्यादींमधून विविध कार्यक्रम आयोजित करण्याच्या सूचना दरवर्षी शासनस्तरावरुन परिपत्रकाद्वारे देण्यात येतात.

त्यानुषंगाने या सचिवालयामार्फत मराठी भाषेसंदर्भातील खाली नमूद केलेले कार्यक्रम साजरे करण्यात येतात. आतापर्यंत करण्यात आलेल्या कार्यक्रमांचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.:-

(१) सन २०१८ मध्ये दिनांक १ ते १५ जानेवारी या कालावधीत **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र व मराठी भाषा विभाग,मंत्रालय** यांच्या समन्वयाने साजरा करण्यात आला होता.

(२) दिनांक २७ फेब्रुवारी २०१८ रोजी **"मराठी भाषा गौरव दिन" वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र व मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई** यांच्या समन्वयाने करण्यात आला होता.

(३) मा. सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद व मा. अध्यक्ष , महाराष्ट्र विधानसभा यांनी घेतलेल्या निर्णयानुसार या सचिवालयाच्या विद्यमाने गुरुवार , दिनांक २७ फेब्रुवारी, २०२० रोजी विधान भवन , मुंबई येथे **मराठी भाषा गौरव दिन (इये मराठीचिये नगरी) मराठी भाषा समिती (ड-१७) कक्षाकडून** साजरा करण्यात आला होता.

(४) कोविड महामारीच्या पार्श्वभूमीवर मार्च २०२० ते जानेवारी २०२१ पर्यंत कार्यक्रम साजरे झालेले नाहीत.

(५) दिनांक २७ फेब्रुवारी.२०२१ रोजी **"मराठी भाषा गौरव दिन"** वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र आणि मराठी भाषा विभाग, मंत्रालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने साजरा करण्यात आला होता.

(६) दिनांक २२ ऑक्टोबर २०२१ रोजी "वाचन प्रेरणा दिन" **मराठी भाषा समिती (ड-१७) व वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र यांच्या समन्वयाने** साजरा करण्यात आला होता.

(७) दिनांक १४ ते २८ जानेवारी.२०२२ या कालावधीत **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा" मराठी भाषा समिती (ड -१७) कक्षाकडून** साजरा करण्यात आला होता.

(८) दिनांक २७ फेब्रुवारी.२०२२ रोजी **"मराठी भाषा गौरव दिन" मराठी भाषा समिती (ड-१७) कक्षाकडून** साजरा करण्यात आला होता.

(९) दिनांक १४ ऑक्टोबर.२०२२ रोजी **"वाचन प्रेरणा दिन" मराठी भाषा समिती (ड-१७) कक्षाकडून** साजरा करण्यात आला होता.

(१०) दिनांक २४ जानेवारी.२०२३ रोजी **"मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"** निमित्त प्रत्यक्ष **कार्यक्रम मराठी भाषा समिती (ड-१७) कक्षाकडून** साजरा करण्यात आला होता.

(११) दिनांक २७ फेब्रुवारी . २०२३ रोजी **" मराठी भाषा गौरव दिन " निमित्त प्रत्यक्ष कार्यक्रम मराठी भाषा समिती (ड-१७) कक्षाकडून** साजरा करण्यात आला होता.

मराठी भाषेसंदर्भातील उक्त नमूद कार्यक्रमांच्या आयोजनाचे अवलोकन केले असता सदर कार्यक्रमांचे आयोजन हे वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र, महाराष्ट्र शासनाचा मराठी भाषा विभाग व मराठी भाषा समिती कक्ष यांच्यामार्फत वेगवेगळया वर्षी वेगवेगळया कक्षामार्फत व विभागामार्फत करण्यात आल्याचे निदर्शनास येते.

**मराठी भाषा विभागाच्या दिनांक ११ सप्टेंबर, २०२३ रोजी निर्गमित केलेल्या शासन परिपत्रकानुसार "वाचन प्रेरणा दिन" या सचिवालयात साजरा करता येईल किंवा कसे ही बाब येथे विचारार्थ/ निर्णयार्थ सादर करण्यात येत आहे.**

या सचिवालयात "वाचन प्रेरण दिन" साजरा करावयाचा असल्यास, त्यानुषंगाने पुढील मुद्दे विचारात घेऊन कार्यवाही करणे संयुक्तिक राहिल:-

- दिनांक १४ व १५ ऑक्टोबर, २०२३ रोजी शासकीय सुट्टी असल्याने सोमवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी दुपारी ३.०० वा. ते ४.०० या वेळेत "वाचन प्रेरणा दिन" साजरा करण्यात यावा असे सुचविण्यात येत आहे.

- महाराष्ट्र विधानसभा सदस्य (पक्षांतराच्या कारणावरुन निरर्हता) नियम, १९८६ अंतर्गत सुरु असलेल्या सुनावण्या ह्या मध्यवर्ती सभागृहात घेण्यात येत असल्याने तसेच दहाव्या मजल्यावरील जागा ही "ह" कक्षाला देण्यात आलेली असल्याने "वाचन प्रेरणा दिन" या कार्यक्रमाचे आयोजन कक्ष क्रमांक ११८ (वार्ताहर कक्ष), पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे करण्यात यावे, असे सुचविण्यात येत आहे.

- कार्यक्रमाचे आयोजन कक्ष क्रमांक ११८ येथे करण्याचे मान्य झाल्यास उक्त ठिकाणची जागा अपुरी असल्याने कार्यक्रमाचे उदघाटन राजशिष्टाचाराच्या दृष्टीने मा. पीठासीन अधिकारी यांच्या शुभहस्ते करणे संयुक्तिक होणार नसल्याने **मा. सचिव-१ (कार्यभार) अथवा मा. सचिव-२ (कार्यभार), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय** यांच्या शुभहस्ते/अध्यक्षतेखाली करणे सोयीचे ठरेल असेही सुचविण्यात येत आहे. यापुर्वी देखील या सचिवालयात दिनांक २२ ऑक्टोबर, २०२१ रोजी "वाचन प्रेरणा दिन" कार्यक्रम मा.प्रधान सचिव यांच्या अध्यक्षतेखाली पार पाडण्यात आला होता.

- गतवर्षीच्या धर्तीवर या सचिवालयातील अधिकारी आणि कर्मचारी हे त्यांचे वाचनानुभव/ अभिवाचन/ कथाकथन / काव्यवाचन इत्यादीचे सादरीकरण करण्यास इच्छूक असल्यास त्याबाबत स्वतंत्र परिपत्रक काढून अवगत करणे संयुक्तिक होईल.

- प्रत्यक्ष कार्यक्रमाचे दृक-श्राव्य चित्रीकरण (व्हिडिओ रेकॉर्डिंग) करुन या सचिवालयाच्या **https://www.youtube.com/c/MAHARASHTRALEGISLATURESECRETARIAT/Playlists** यु टयूब चॅनेलवर तसेच **"महाराष्ट्र विधानमंडळ मराठी भाषा समिती"** या **फेसबुक अकाऊंट वर** प्रसारित करण्यात यावे असे सुचविण्यात येत आहे.

- *कार्यक्रमाची रुपरेषा (मिनीट-टू-मिनीट) पृष्ठ क्रमांक ९/२२ वर जोडण्यात आली आहे.*

पृ ३४

**उपरोक्त प्रस्तावित बाबी मान्य झाल्यास, पुढीलप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल:-**

(१) "वाचन प्रेरणा दिन" या कार्यक्रमासाठी सोमवार , दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी कक्ष क्रमांक ११८ (वार्ताहर कक्ष), पहिला मजला, विधान भवन, मुंबई आरक्षित करण्याबाबत, वार्ताहर कक्षातील व्यासपीठ व्यवस्था (पोडियम), मान्यवरांना देण्यासाठी पुष्पगुच्छ, दीपप्रज्वलन व्यवस्था, ग्रंथपूजन व्यवस्था (टेबल व इतर साहित्य), ध्वनीयंत्रण व्यवस्था (माईक व कॉलर माईक सहित) इ. कार्यवाही करणे तसेच कार्यक्रमाचे छायाचित्रण करणे, ०१ बॅनर व ०२ स्टॅण्डी पुरविणे, प्रत्यक्ष कार्यक्रमाचे दृक - श्राव्य चित्रीकरण (व्हिडिओ रेकॉर्डिंग) करुन त्याचे प्रक्षेपण या सचिवालयाच्या **https://www.youtube.com/c/MAHARASHTRALEGISLATURESECRETARIAT/Playlists** **यु टयूब चॅनेलवर** करणे इत्यादी कामे करण्याबाबत नियुक्त करण्यात आलेल्या ठेकेदारास आवश्यक पत्रव्यवहार करण्याबाबत **"ग-२"** कक्षास कळविण्यात यावे.

(२) ग्रंथपूजनासाठी भगवद् गीता, ज्ञानेश्वरी, लिळाचरित्र, तुकोबाची गाथा, भारताचे संविधान, माजी राष्ट्रपती स्व. डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांचे साहित्य आणि ज्ञानपीठ पुरस्कार विजेते मराठी साहित्यिक सर्वश्री वि.स.खांडेकर, वि.वा.शिरवाडकर (कुसुमाग्रज), विंदा करंदीकर व डॉ.भालचंद्र नेमाडे यांच्या साहित्यकृती, शिवराज्याभिषेक व शिवचरित्रपर पुस्तके कार्यक्रमस्थळी उपलब्ध करण्याबाबत **"ग्रंथालय"** कक्षास अवगत करण्यात यावे. तसेच कार्यक्रमामध्ये या सचिवालयाच्या ग्रंथालय कक्षाचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे ग्रंथालयात उपलब्ध वाचनीय व उत्कृष्ट मराठी ग्रंथसंपदेबाबतची माहिती व या सचिवालयातील अधिकारी/कर्मचारी यांना **वाचनासाठी प्रेरणा मिळणेहेतू काही मार्गदर्शन असल्यास, त्याबाबतचे सादरीकरण करण्याबाबत ग्रंथालय कक्षास कळविण्यात यावे.**

(३) कार्यक्रमासंदर्भात या सचिवालयातील अधिकारी व कर्मचारी यांना परिपत्रकाद्वारे अवगत करण्यात यावे. कार्यक्रमामध्ये सहभागी होण्यास इच्छुक अधिकारी/कर्मचारी यांनी स्वत:चे नाव, पदनाम व ते ज्या वाचनप्रकाराचे सादरीकरण देऊ इच्छितात त्याची **संक्षिप्त माहिती बुधवार, दिनांक ११ऑक्टोबर , २०२३ रोजीपर्यंत मराठी भाषा समिती (ड-१७) कक्षास उपलब्ध करुन देण्याबाबत परिपत्रकान्वये कळविण्यात यावे.** परिपत्रकाचा मसुदा पृ.क्र. ११ वर मान्यतेसाठी सादर करण्यात आला आहे. सादरीकरणामध्ये उत्कृष्ट व

वाचनीय अशा साहित्याचा समावेश व सादरीकरणाचे विषय एकसारखे नसावेत यासाठी इच्छूक अधिकारी/कर्मचारी यांच्याकडून प्राप्त झालेली साहित्यासंदर्भातील माहिती या सचिवालयातील **श्री. सचिन बोरकर, पर्यवेक्षक यांच्याकडे सादरीकरणासाठी उचित साहित्य ठरविण्यासाठी पाठविण्यात यावी.**

(४) सोमवार, दिनांक ०९ ऑक्टोबर, २०२३ रोजीपासून ते कार्यक्रमाच्या दिनांकापर्यंत ०२ लिपिक-टंकलेखक आणि ०२ शिपाई तसेच सोमवार, दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी कक्ष क्रमांक ११८ (वार्ताहर कक्ष) पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे ०६ मदतनीस एवढ्या जास्तीच्या मनुष्यबळाची आवश्यकता आहे. अत: अनुक्रमे लिपिक-टंकलेखक पुरविण्याबाबत क-१ (आस्थापना) कक्षास व वर्ग-ड चे कर्मचारीवृंद पुरविण्याबाबत ग-१ व ग-२ कक्षास कळविण्यात यावे.

(५) कार्यक्रमाच्या दिवशी आवश्यक माईक, लाऊड स्पीकर व तद्नुषंगिक अन्य व्यवस्था करण्याबाबत तसेच सदर कार्यक्रमाच्या ठिकाणी विद्युत व्यवस्था, वातानुकुलित यंत्रणा याची देखरेख करण्यासाठी विद्युत विभागाचे ०२ कर्मचारी दिनांक १६ ऑक्टोबर, २०२३ रोजी कार्यक्रम संपेपर्यंत नियुक्त करण्याबाबत सार्वजनिक बांधकाम विभाग (विद्युत) कक्षास कळविण्यात यावे.

(६) **"वाचन प्रेरणा दिन" प्रत्यक्ष साजरा होणार असल्याने, बाहय यंत्रणेकडून केलेले दृक-श्राव्य चित्रीकरण** या सचिवालयाच्या **https:// www.youtube.com /c/ MAHARASHTRALEGISLATURESECRETARIAT / Playlists या यु टयुब चॅनेलवर** आणि **"महाराष्ट्र विधानमंडळ मराठी भाषा समिती" या फेसबुक अकाऊंटवर** प्रक्षेपित करणे तसेच कार्यक्रमासंदर्भातील **परिपत्रक महाराष्ट्र विधानमंडळाच्या** www.mls.org.in **संकेतस्थळावरील मराठी भाषा समिती सदराखाली उपलब्ध करुन देणे इत्यादी कार्यवाही** करण्याबाबत **"संगणक (क-२)" कक्षास कळविण्यात यावे.**

(७) "वाचन प्रेरणा दिन" या कार्यक्रमाच्या ठिकाणी सुरक्षा सहायक पुरविण्याबाबत **"सुरक्षा विभागास"** कळविण्यात यावे.

(८) या सचिवालयात साजरा होणाऱ्या "वाचन प्रेरणा दिन" या कार्यक्रमास अधिकारी/ कर्मचारी यांनी उपस्थित राहण्याबाबत त्यांना उद्-घोषणेव्दारे व दुरध्वनीव्दारे कळविण्याबाबत **अग्निशमन विभाग व दुरध्वनी कक्षास** कळविण्यात यावे.

या संदर्भात असेही सविनय प्रस्तुत करण्यात येते की, या सचिवालयात विधिमंडळाची मराठी भाषा समिती सन २०१७ मध्ये घटीत करण्यात आली आहे. **म. वि. स. नियम २४४ (थ)(द) तसेच म.वि.प. नियम २१४ (ड) व २१५ मध्ये मराठी भाषा समितीच्या कार्यकक्षेत खालीलप्रमाणे कामांची तरतूद करण्यात आलेली आहे.**

- कार्यालयीन कामकाजांमध्ये मराठी भाषेच्या वापराबाबत आढावा घेऊन राज्य शासनाला सूचना देणे व उपाययोजना सुचविणे.
- महाराष्ट्र राजभाषा अधिनियम, १९६४ अन्वये "मराठी" ही शासन व्यवहारासाठी राजभाषा म्हणून स्वीकारण्यात आली आहे. सर्व क्षेत्रांत मराठी भाषेचा वापर करण्याच्या दृष्टीने मराठीच्या वापराचा आढावा घेण्यासाठी राज्यातील राज्य शासकीय/निमशासकीय कार्यालयांमध्ये मराठी भाषेच्या वापरासंदर्भात आढावा घेऊन त्याबाबत राज्य शासनाला सूचना देणे व उपाययोजना सुचविणे.

विधानमंडळ ही स्वायत्त संस्था असून, विधानमंडळाचे काम हे राज्य शासनाने म्हणजेच प्रशासनाने राबविलेले प्रकल्प, योजना, इत्यादी बाबींवर संसदीय लोकशाहीच्या संवर्धनासाठी व यशस्वीतेसाठी विविध योजना, धोरणे, शासनाच्या संपूर्ण प्रशासन व्यवस्थेवर सखोल, संपूर्ण प्रभावी व अर्थपूर्ण असे नियंत्रण व देखरेख ठेवण्याची आत्यंतिक गरज आहे आणि म्हणूनच कार्यकारी प्रशासन राबवित असलेल्या विविध योजनांचा अभ्यास करण्यासाठी त्यातील त्रुटी शोधून काढून, योजना अंमलबजावणीला व पर्यायाने प्रशासनाला गती देण्यासाठी समित्यांची निर्मिती करण्यात आली आहे व मराठी भाषा समितीच्या माध्यमातून मराठी भाषेसंदर्भात कार्यक्रम आयोजित करण्यासंदर्भात शासनाकडून निर्गमित करण्यात येणाऱ्या परिपत्रकातील बाबींवर सनियंत्रण व देखरेख करण्याची जबाबदारी या समितीची आहे.

सद्य:स्थितीत विधानमंडळाच्या सर्वच समित्यांचे कामकाज नवीन सरकार स्थापनेमुळे नव्याने समित्या घटित होईपर्यंत स्थगित करण्यात आलेले आहे. मराठी भाषेच्या कार्यक्रमासंदर्भात साजरे करण्यात येणाऱ्या कार्यक्रमाबाबत मराठी भाषा विभागाकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात येणाऱ्या परिपत्रकामध्ये नमूद केलेले कार्यक्रम हे प्रशासकीय यंत्रणेमार्फत राबवावयाचे असून सदरचे कार्यक्रम मराठी भाषा समितीमार्फत राबविले गेल्यास, कार्यकारी प्रशासनाच्या कामाची अंमलबजावणी विधानमंडळ करीत असल्यासारखे होईल. विधानमंडळाच्या समित्यांच्या कामकाजाची कार्यकक्षा महाराष्ट्र विधानसभा नियमात निश्चित केली आहे. अशाप्रकारे प्रशासकीय यंत्रणा राबवित असलेली कामे इतर समित्यांनीही करण्याची मागणी केल्यास त्याची अंमलबजावणी करणे विधानमंडळ प्रशासनास शक्य होणार नाही तसेच विधानमंडळाच्या समित्यांचे कामकाज गोपनीय स्वरुपाचे असल्यामुळे ते जनतेसाठी व प्रसार माध्यमांना खुले असणार नाही असेही नम्रपणे नमूद करावेसे वाटते.

प्रसंगावत असेही नमूद करण्यात येते की, यापूर्वी विधानमंडळात "मराठी भाषा संवर्धन पंधरवडा"(दिनांक १४ ते २८ जानेवारी), "मराठी भाषा गौरव दिन" (दिनांक २७ फेब्रुवारी), "मराठी राजभाषा दिन" (दिनांक १ मे), "वाचन प्रेरणा दिन" (दिनांक १५ ऑक्टोबर) या दिन विशेषाच्या निमित्ताने मराठी भाषेसंदर्भात विविध कार्यक्रमाचे आयोजन वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राच्यामार्फत करण्यात आलेले आहे. **जनसंपर्क विषयक व या सचिवालयात आयोजित होणारे विविध विषयांवरील परिसंवाद/चर्चासत्रे** या सर्व कामांचे वाटप देखील दिनांक २२ एप्रिल २०२२ रोजीच्या कार्यालर्यीन आदेश क्र.८४०१/क-१ व दिनांक २७ जून २०२३ रोजीच्या कार्यालयीन आदेश क्र.१०८२२/क-१ अन्वये **वि. स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राकडे सोपविण्यात आले आहे.** या सचिवालयातील विविध सांस्कृतिक कार्यक्रमांचे आयोजन वि . स. पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत करण्यात येत असते. **वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राने माहे ऑगस्ट, २०२२ मध्ये दोन्ही सभागृहास सादर केलेल्या त्यांचा आठव्या , नवव्या व दहाव्या अहवालामध्ये मराठी भाषेबाबत कार्यक्रमाचे आयोजन त्या कक्षाकडून करण्यात आल्याचा तपशील समाविष्ट केलेला आहे .** तसेच यापूर्वी या सचिवालयात मराठी भाषेसंदर्भात आयोजित केलेल्या कार्यक्रमाचे आयोजन **वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्राने केलेले आहे.**

**मराठी भाषा समितीच्या नियमित कामकाजामध्ये बैठका व दौरे आयोजित करणे, तद्संबंधी पत्रव्यवहार करणे, साक्षी घेणे, अहवाल सभागृहास सादर करणे व तद्नुषंगिक अन्य कामांचा समावेश होतो. मराठी भाषेचे कार्यक्रम हे एका सुनिश्चित दिनांक व कालावधीत करावे लागतात. नेमके अशावेळीच मा.समिती प्रमुखांनी बैठका, दौरे इत्यादींचे आयोजन करण्याचे निदेश दिल्यास, कार्यक्रम सुनिश्चित दिनांकास वा कालावधीत पार पाडण्यामध्ये कक्षातील अधिकारी व कर्मचारी व्यग्र राहिल्यास समितीच्या आवश्यक व प्रमुख कामावर त्याचा विपरीत परिणाम होण्याची शक्यता नाकारता येत नाही.** त्यामुळे आगामी काळात महाराष्ट्र विधानमंडळाच्या समित्या घटित होण्याची शक्यता अभ्यासता **मराठी भाषेसंदर्भातील सर्व कार्यक्रम हे वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्रामार्फत करण्याबाबत आदेशित व्हावे असे नम्रपणे सुचविण्यात येत आहे.** मान्य झाल्यास, उक्त टिप्पणीची एक प्रत उचित कार्यवाहीसाठी वि.स.पागे संसदीय प्रशिक्षण केंद्र कक्षाकडे पाठविण्यात येईल.

अत: महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या विद्यमाने सोमवार, दिनांक १६ ऑक्टोबर,२०२३ रोजी "वाचन प्रेरणा दिन" कक्ष क्रमांक ११८ (वार्ताहर कक्ष), पहिला मजला, विधान भवन, मुंबई येथे साजरा करण्याबाबतचा प्रस्ताव मा. सचिव- १ (कार्यभार) यांच्या आदेशार्थ प्रस्तुत करण्यात यावा. मान्यता प्राप्त झाल्यानंतर उपरोक्तपणे कार्यवाही करण्याबाबत सर्व संबंधितांना कळविण्यात येईल.

प्रस्ताव आदेशार्थ तथा मान्यतेकरिता प्रस्तुत.

२५/९/2023

क. अ. (श्री. गांवकर) : 25/9/23

अवर सचिव (श्री. खोंदले) : खोंदले 03.10.2023

उप सचिव ( श्री. नलावडे ) : 04/10/23

मा. सचिव १ (कार्यभार) :

६/१०